ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २० ऑगस्ट, १९५८ अंक १४

## त्रिविध माहिती

**हुतात्म्यांच्या आश्रितांना मदत**—१९४७ सालीं पाकिस्ताननें काश्मीरवर हल्ला केला, त्यावेळीं पाकिस्तानी सैन्याशीं मुकाबला करतांना बरेच काश्मीरी नागरिक कामास आले. त्यांपैकीं १४० हुतात्म्यांच्या आश्रितांना मदत देण्यासाठी काश्मीरच्या सरकारनें ७७,००० रुपये मंजूर केले आहेत. आश्रितांना दरमहा २५ पासून ५० रुपयांपर्यंत मदत देण्यांत येणार आहे.

**आसाममधील तेलाच्या विहिरी**—आसाममध्यें दिगबोई येथें नव्यानें खणण्यांत येणाऱ्या तेलाच्या विहिरींपैकी आतांपर्यंत २३ विहिरी यशस्वी झाल्या आहेत. उरलेल्या ११ विहिरींत नैसर्गिक वायु आढळला असून ४ विहिरी मात्र कोरड्या आहेत. ह्या विहिरी आणखी खोल खणण्यासाठी अद्यावत् यंत्रसामुग्रीची जरूरी आहे.

**रशिआचें नवें वीजकेंद्र**—रशिआनें कुश्विशेव्ह येथें जगांतील सर्वांत मोठें जलविद्युत्‌केंद्र बांधलें आहे. ह्या धरणाचें दैनंदिन काम मॉस्कोहून दूरनियंत्रक यंत्रांच्या साह्यानें चालविण्यांत येणार आहे. धरणाच्या यंत्रालयांत २० वीज-उत्पादक असून त्यावर नजर ठेवण्यासाठी अवघीं चार माणसें यंत्रालयांत रहातील.

**विमाप्रचारकांना प्रोत्साहन**—आयुर्विमा कॉर्पोरेशननें आपल्या ३३ विभागांतील विमाप्रचारकांना प्रोत्साहन देण्यासाठी ६०,००० रुपयांची रोख बक्षिसें देण्याचें जाहीर केलें आहे. १९५८ च्या जुलैपासून डिसेंबर अखेरपर्यंत विशेष काम करणाऱ्या प्रचारकांसाठी २०० पारितोषिकें ठेवलीं आहेत. त्याशिवाय अखिल भारतीय स्पर्धेत दोन सुवर्णपदकेंहि ठेवण्यांत आलीं आहेत.

**चहाचें प्रायोगिक केंद्र**—भारताच्या टी बोर्डाच्या मदतीनें अन्नमलाई येथें १५० एकर जमिनींत चहाच्या उत्पादनाचें एक प्रायोगिक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. अन्नमलाई येथील मळ्यांतून मद्रास राज्यांत उत्पन्न करण्यांत येणाऱ्या चहापैकी ५० टक्के चहा पिकविला जातो. जमीन मिळविण्यासाठी सध्या मद्रास सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत.

**भारतीय चित्रपटांना बंदी करा**—कराची चित्रपट निर्मात्यांच्या संघटनेनें पाकिस्तान सरकारला अशी सूचना केली आहे कीं, भारतांतून आयात करण्यांत येणाऱ्या सर्व बोलपटांना बंदी करण्यांत यावी. पाकिस्तानमधील चित्रपटाचा धंदा बाल्यावस्थेंत असल्यामुळें अशा बंदीची आवश्यकता आहे असें संघटनेचें मत आहे.

**जपानमधील बोट बांधण्याचा धंदा**—अमेरिकेंत आलेल्या आर्थिक मंदीमुळें जपानमधील बोटी बांधण्याचे धंद्याला चांगलाच तडाखा बसला आहे. बोटींच्या मागण्या कमी होत चालल्या असून बोटबांधणीच्या गोद्या थंडावत चालल्या आहेत. अर्थातच बेकारीची लाट पसरूं लागली आहे. बोट-कारखानदार सरकारकडून साह्याची अपेक्षा करीत आहेत.

**पाकिस्तानची कोसळती अर्थव्यवस्था**—पाकिस्तानमधील धंदेवाल्यांची एक बैठक पाकिस्तान फेडरेशन ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींत पाकिस्तानची अर्थव्यवस्था कोसळण्याच्या अवस्थेंत आहे असा इषारा सरकारला देण्यांत आला. आर्थिक अरिष्टाची जबाबदारी कांहीं राजकीय नेत्यांवर टाकण्यांत आली आहे.

**जपान-भारत करार**—जपान आणि भारत ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें ह्या महिन्यापासून चालू झालेल्या वर्षभराच्या काळांत जपान भारताकडून १६ लाख टन अशुद्ध लोखंडाची माती घेणार आहे. लोखंडाच्या मातीच्या निर्यातीमुळें भारताला एकूण ९.५ कोटि रुपयांची प्राप्ति होईल. ह्या रकमेपैकी कांहीं भाग जपानकडून पोलाद खरेदी करण्यासाठी खर्च केला जाईल.

**गणिती महिलेचा दौरा**—गणिताच्या विलक्षण ज्ञानामुळें प्रसिद्धि पावलेल्या श्रीमती शकुंतला देवी ह्या फिलिपाइन्स व बोर्निओचा दौरा करून आतां हाँगकाँगला गेल्या आहेत. त्यानंतर त्या जपान, ऑस्ट्रेलिआ व न्यूझीलंडचा प्रवास करून भारतांत परत येतील. आपल्या प्रवासाविषयीं त्या पुस्तक लिहिणार आहेत.

**वहातुकीच्या खर्चांत बचत**—लंडन पॅसेंजर ट्रॅन्स्पोर्ट ॲथॉरिटीच्या चालकांनीं आपल्या दुमजली बसेसच्या मागल्या चाकांसाठी वंगणाचें तेल म्हणून खनिज तेल न वापरतां वनस्पति वापरण्याचें ठरविलें आहे. वनस्पति तेलाच्या वापरामुळें वाहतुकीच्या खर्चांत दरसाल १ लाख, २० हजार पौंड बचत होणार आहे.

**कॅनडाकडून आयात**—कोलंबो मदत योजनेप्रमाणें भारत कॅनडाकडून सुमारें १ कोटि डॉलर्स किंमतीचें तांबें, अल्युमिनम आणि निकेल आयात करणार आहे. गेल्या वर्षी १.१ कोटि डॉलर्स किंमतीच्या ह्याच वस्तू आयात करण्यांत आल्या. कॅनडाकडून मिळणाऱ्या डॉलर्सच्या मदतीची रक्कम २.३ कोटि डॉलर्स आहे.

## ठेवींवरील व्याजाचे कमाल दर

### बँकांची एकवाक्यता : स्पर्धेस आळा

इंडियन बँक्स असोसिएशननें बँकांच्या ठेवींवरील व्याजाच्या दरांत एकवाक्यता आणण्याचे प्रयत्न चालविले होते, ते यशस्वी होत आहेत, असें समजतें. असोसिएशननें केलेल्या योजनेस सर्व मोठ्या बँकांनीं अनुमति दिली आहे. एक्सचेंज बँकांची संमतीहि लवकरच मिळेल, अशी अपेक्षा आहे. तीन महिन्यांच्या शॉर्ट टर्म ठेवींवरील व्याजाचा दर ४% पेक्षा ज्यास्त असूं नये; ठेवीच्या रकमेची कमाल मर्यादा ५०,००० रु. असावी, असें ठरणार आहे. इतर व्याजाचे कमाल दर खालीलप्रमाणें रहातील :—

| | |
|---|---|
| तीन महिन्यांपेक्षा कमी मुदत : | ३–७/८% |
| ५ वर्षांचें सेव्हिंग्ज सर्टिफिकिट : | ४–१/४% |
| ३ वर्षांचें सेव्हिंग्ज सर्टिफिकिट : | ४% |
| सेव्हिंग्ज खातें | २–१/२% |

तपशीलाचे मुद्दे तूर्त मुद्दामच पक्के केलेले नाहींत; सहा महिन्यांच्या अनुभवानंतर त्यांचा विचार केला जाईल.

### फॉरिन एक्सचेंज डीलर्स असोसिएशन ऑफ इंडिया

दि इंडियन बँक्स असोसिएशन व दि एक्सचेंज बँक्स असोसिएशन ह्यांनीं मिळून वरील नांवाची असोसिएशन स्थापन केली आहे. एक्सचेंज कंट्रोलच्या नियमांचे बंधनांत फॉरिन एक्सचेंजचा व्यवहार सुनियंत्रित करणें, हा त्याचा उद्देश आहे. आतांपर्यंत विदेशी बँकांचेंच सभासदत्व असलेल्या एक्सचेंज बँक्स असोसिएशननें हें काम चालविलें आहे. पण आतां हिंदी बँकाहि ह्या क्षेत्रांत काम करूं लागल्या असून तें कामहि वाढत आहे; म्हणून ही संयुक्त संस्था आवश्यक झाली आहे. नव्या संस्थेनें रिझर्व्ह बँकेकडे मंजुरीसाठीं अर्ज केला आहे.

### भारतांतील साखरेचा व गुळाचा खप

| वर्ष | लोकसंख्या (कोटि) | साखर व गूळ खप (लक्ष टन) | दर माणशी खप (पौंड) |
|---|---|---|---|
| १९५०–५१ | ३६·१ | ४४·५८ | २७·६६ |
| १९५१–५२ | ३६·६ | ४५·१४ | २७·६३ |
| १९५२–५३ | ३७·१ | ४६·३० | २७·९५ |
| १९५३–५४ | ३६·५ | ४८·२२ | २८·८० |
| १९५४–५५ | ३८·० | ४८·०० | २६·०० |
| १९५५–५६ | ३८·३ | ५०·०० | २८·२९ |
| १९५६–५७ | ३८·८ | ५१·४० | २९·१० |

आहारतज्ज्ञांच्या मतें, दरमाणशीं वार्षिक उठाव सुमारें ४७ पौंड हवा; भारतांत तो २९ पौंडच आहे. डेन्मार्कमध्यें तो १२८ पौंड, नेदरलंडस व ऑस्ट्रेलिया येथें १२२ पौंड, ग्रेटब्रिटनमध्यें ११० पौंड, न्यूझीलंडमध्यें १०६ पौंड, अमेरिकेंत १०४ पौंड, कॅनडांत १०२ पौंड, स्वित्झरलंडमध्यें ९६ पौंड आणि जर्मनींत ६९ पौंड आहे. ह्या खपांत औद्योगिक उपयोगासाठी खर्ची पडलेल्या साखरेचाहि समावेश आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.


* सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. *

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक–गृह, मुंबई ४. [ टेलिफोन २७०९४

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ७,९७,८४० |
| रिझर्व्ह फंड | रु. ८,३४,७०० |
| ठेवी | रु. १,७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,९९,६९,००० |

बँकेच्या शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक–गृह, गिरगांव, मुंबई ४.

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दरावाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २० ऑगस्ट, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चलनवाढीचा ताप असह्य होऊं लागला

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचें दिग्दर्शन : परिस्थितीचें सरकारला आव्हान

गेल्या कांहीं महिन्यांतील वाढत्या महागाईमुळें चिंताजनक परिस्थिति निर्माण झाली आहे. ऑगस्ट, १९५७ मध्यें घाऊक किंमतींचा निर्देशांक ( १९५२–५३ = १०० ) ११२ चे पेक्षा थोडा अधिक होता. फेब्रुवारी १९५८ पर्यंत तो हळुहळु उतरत जाऊन १०५ वर आला. पण तेव्हांपासून तो एकसारखा वाढत असून आतां ११६ वर गेला आहे. अन्नपदार्थांच्या किंमती त्या पदार्थांची बाजारांतील उपलब्धता व त्यांची आयात ह्यानुसार हेलकावे खात आहेत. १९५७–५८ मध्यें उत्पादन घटल्यामुळें, अन्नपदार्थांच्या किंमतींचा निर्देशांक सध्यां बराच वर गेला आहे. औद्योगिक कच्च्या मालाचें उत्पादन १९५२-५३ नंतर वाढलें असलें, तरी त्याच्या किंमतीहि वाढत चालल्या आहेत. चलनवाढीचे दुष्परिणाम मर्यादित राखणाऱ्या गोष्टींचा प्रभाव कमी झाल्याचीं हीं चिन्हें आहेत.

### मोठ्या आयातीमुळें किंमती रोखल्या गेल्या

जगांतील इतर देशांचे मानानें भारतांतील किंमतवाढ समाधानकारकच मानली पाहिजे, असें खालील तक्ता दर्शवितो. इंटर नॅशनल मोनेटरी फंडानें तो तयार केलेला आहे.-

| देश | १९५३—मार्च १९५८ मुदतींतील किंमत—वाढ |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन ... ... | – ५% ( कच्चा माल ) |
| | + १३% ( पक्का माल ) |
| ऑस्ट्रेलिया ... ... | + ४% |
| कॅनडा ... ... | + ३% |
| फ्रान्स ... ... | + २०% |
| प. जर्मनी ... ... | + ७% ( शेतकी ) |
| | + २०% ( औद्योगिक ) |
| भारत ... ... | बदल नाहीं |
| जपान ... ... | – १% |
| अमेरिका ... ... | + ९% |

वरील देशांपैकी फ्रान्स वगळला, तर बाकीच्यांना "तुटींच्या अर्थव्यवस्थे"चा अवलंब करावा लागलेला नाहीं. भारतांत १९५२–५३ नंतर १,००० कोटी रुपयांचा खर्च नोटा छापून भागविण्यांत आलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर कृत्रिम चलनवाढ होऊनहि किंमती जास्त भडकल्या नाहींत, ही समाधानाची गोष्ट आहे. हें शक्य होण्याचें कारण, आपण निर्गतीपेक्षा जास्त आयात करीत होतों हेंच होय. त्यामुळें परदेशांतील आपल्या शिलका आपण संपवीत आणल्या; गेल्या २½ वर्षांत आपण त्या शिलकांतलें ५५० कोटी रुपये वापरले ! कृत्रिम चलनवाढीचा धक्का सुसह्य करण्यास आतां आणखी पुरेशा परदेशी शिलका उपलब्ध नाहींत; परदेशी मदत मिळाली तरच घडगत आहे. परदेशी मदत हुकमी मिळणें संभवत नसल्यामुळें तिच्यावर विसंबून रहाणें धोक्याचें आहे.

### उत्पादन-वाढीची गति खुंटली

कृत्रिम चलनवाढीचा दुष्परिणाम आटोक्यांत राखण्यास अंतर्गत उत्पादन वाढीनेंहि मदत केली. गेल्या वर्षीपर्यंत औद्योगिक उत्पादन एकसारखें वाढत गेलें. उत्पादनक्षमता पुरेशी उपयोगांत आणली जात होत होती; त्यासाठी फारशी नवी गुंतवणूक लागली नाहीं. कांहीं अंशीं नव्या यंत्रसामुग्रीच्या वापरामुळेंहि उत्पादन वाढलें. परंतु आतां उत्पादनाचे बाबतींत प्रगति घटली असून, पठारावर येऊन आपण ठेपलों आहों. शेतीचें उत्पादन घटल्यामुळें परिस्थितीचा बिकटपणा अधिकच जाणवूं लागला आहे.

अशा परिस्थितींत भविष्यकाळाबद्दल विचार न करणें मूर्खपणाचें ठरेल. चलनवाढीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सर्व मार्गांनीं कसोशीनें प्रयत्न करावे लागतील. त्यांतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे शेतीचें उत्पादन सालोसाल वाढत गेलेंच पाहिजे; पावसानें कांहीं ठिकाणीं दगा दिला तरीसुद्धां त्यामुळें होणारी उत्पादनांतील घट भरून निघून एकंदरीनें वाढच अनुभवास आली पाहिजे. कृत्रिम चलनवाढीची पातळी फार वाढूं न देण्याचा निर्धार सरकारनें वारंवार जाहीर केलेला आहे; पंचवार्षिक योजनेला त्यासाठी शक्य तेथें कात्री लावली जाणार आहे. ही घोषणा प्रत्यक्षांत कशी उतरते, ह्यावर बरेंचसें अवलंबून आहे. सरकारच्या अर्थ-विषयक कारभाराला तें एक आव्हानच आहे. परदेशांकडून कर्जें मिळविण्याचे बाबतींत सरकारला किती यश मिळतें, तेंहि किंमती रोखून धरण्यास साहाय्यकारक होईल.

### बँकांना काय करतां येईल ?

बँकांना ह्या बाबतींत काय मदत करतां येईल ? अन्नाच्या उत्पादनवाढीची जागा केवळ नाणेंविषयक नियंत्रणें कधींच घेऊं शकणार नाहींत, हें उघड आहे. त्याचप्रमाणें, साठेबाज, नफेबाज व काळाबाजारवाले ह्यांच्या कारवायाहि बँकांच्या कक्षेबाहेर आहेत. हें खरें असूनहि, बँकांना आपल्या परीनें महत्त्वाची कामगिरी पार पाडतां येणें शक्य आहे. जनतेजवळचा शक्य तेवढा पैसा आकर्षून घेऊन तो मालाचे पाठीमागें जाऊं न देणें, हा उद्देश बँकांनीं डोळ्यांसमोर ठेवला आणि त्याबरोबरच उत्पादनवाढ आणि उत्पादनाचें योग्य मार्गें वितरण ह्यांस उत्तेजन चालूं ठेवलें, तर बरेंच कार्य होईल. रिझर्व्ह बँक ह्याच धोरणानें कर्जविषयक हालचाली करीत आहे. नवी कर्जउभारणी यशस्वी झाली आहे. ट्रेझरी बिलांची विक्री रिझर्व्ह बँकेनें पुनः सुरू केली आहे. ज्या प्रमाणांत जनतेकडून ट्रेझरी बिलें व सरकारी कर्जरोखे घेतले जातील, त्या प्रमाणांत कृत्रिम चलनवाढ अनावश्यक होईल. रिझर्व्ह बँकेला इतर बँकांवर कांहीं बाबतींत सक्ति करण्याचा अधिकार असला, तरी प्रत्येक बँकेनेंच ह्या दृष्टीनें प्रयत्न करणें सर्वांच्या हिताचें, सोईचें व परिणामकारक होईल.

## भारतांतील बँकांविषयीं आंकडेवार माहिती*

### अन्वय आणि अर्थ

रिझर्व्ह बँकेचें प्रस्तुत वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांत नेहमींप्रमाणें भारतांतील प्रत्येक बँकेविषयीं तपशीलवार आंकडे आणि भारतीय बँकिंगविषयीं एकत्रित तपशीलवार आंकडे दिलेले आहेत. बँकांच्या ताळेबंदांचे आधारावरच हे आंकडे आधारलेले आहेत. ह्या वार्षिकांतील तक्त्यांवरून, १९५७ मध्यें हिंदी बँकांनीं केलेल्या प्रगतीची उत्कृष्ट कल्पना येते. बँकांच्या ठेवी कशा व किती वाढल्या, कर्जें कशीं दिलीं गेलीं, रोख्यांत गुंतवणूक कशी झाली, कचेऱ्यांची संख्या, नफा-तोटा, इत्यादींचा तपशील वार्षिक दिलेला आहे.

बँकांच्या व्यवहारांत १९५७ मध्यें बरीच वाढ झाली, पण ती मुख्यत शेड्यूल्ड बँकांच्या व्यवहारांतच झाली. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी घटल्या, कर्जें कमी झालीं, सरकारी रोख्यांतील गुंतवणूक उतरली आणि त्यांच्या कचेऱ्याहि कमी झाल्या. तथापि, दोन महत्त्वाच्या बिगर-शेड्यूल्ड बँकांचें शेड्यूल्ड बँकांत रूपांतर झाल्यामुळेंच मुख्यत: ही घट झालेली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या दोन बँका म्हणजे बँक ऑफ पतियाळा व स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र, ह्या होत. बँक ऑफ पतियाळाचें वसूल भांडवल १५ लक्ष रु. असून ठेवी ८.६५ कोटि रुपयांच्या आहेत आणि तिच्या शाखांची संख्या ४७ आहे. स्टेट बँक ऑफ सौराष्ट्रचें वसूल भांडवल १ कोटि रु. असून तिच्याकडे १५.५६ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत आणि तिच्या ६१ शाखा आहेत. अशा परिस्थितींत, बिगर-शेड्यूल्ड बँकांची वैयक्तिक प्रगति होऊनहि त्यांचें एकत्रित आंकडे तुलनात्मकदृष्ट्या प्रतिकूल चित्र दाखविणें अपरिहार्य आहे.

शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत २८० कोटि रुपयांची वाढ झाली. हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत २६४ कोटि रुपयांची भर पडली, तर विदेशी शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी १६ कोटि रुपयांनीं सुधारल्या. हिंदी शेड्यूल्ड बँकांना ठेवींतील वाढीबद्दल श्रेय मिळालें, पण त्या वाढीपैकी निम्मी वाढ एकट्या स्टेट बँक ऑफ इंडिआच्या बाबतींतच झालेली आहे; आणि त्याचें कारणहि एका विशिष्ट घटनेचें आहे. ( अमेरिकेकडून पी. एल. ४८० खालीं झालेली गव्हाची आयात व त्यामुळें निर्माण केल्या गेलेल्या ठेवी. ) ठेवींतील वाढीपैकी दोन तृतीयांश वाढ मुदतीच्या ठेवींत आहे; त्यामुळें बँकांना व्याजासाठी जास्त रक्कम खर्च करावी लागली.

शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांची रक्कम १९५७ अखेर ८९४ कोटि रु. होती. म्हणजे, १९५६ अखेरीच्या मानानें ७४ कोटी रु. जास्त होती. आयातीवरील निर्बंधामुळें कर्जांची मागणी कमी झाली, रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यास अनुसरून बँकांनीं कर्जें कमी केली आणि १९५७ च्या मध्यानंतर मोसमी कर्जांत खूपच घट झाली. वर्षअखेरीच्या आंकड्यांवरून, १९५६ चे मानानें १९५७ अखेर कर्जांची रकम निम्म्यानेंच वाढलेली दिसली, तरी सबंध वर्षभराची सरासरी काढली, तर १९५६ मध्यें कर्जांची वाढ १४० कोटि रु. होती, ती १९५७ मध्यें १२९ कोटि रु. झाली, असें आढळतें. म्हणजे, वर्षअखेरीचे आंकडे संबंध वर्षभराची परिस्थिति नीट दाखवीत नाहींत. बँकांच्या किफायतशीरपणास फारसा बाध आला नाहीं त्याचें हेंच कारण आहे.

शेड्यूल्ड बँकांची इनव्हेस्टमेंट गेलीं तीन वर्षें ४०० ते ४२० कोटि रुपयांच्या आसपास होती, ती १९५७ अखेर ५०० कोटि रुपयांपर्यंत वाढली.

बँकांचें उत्पन्न वाढलें, खर्च वाढला आणि नफाहि पण वाढला. शेड्यूल्ड बँकांचा ( हिंदी व विदेशी ) नफा २¼ कोटि रुपयांनीं वाढला; १९५६ मध्यें तो ३ कोटि रुपयांनीं वाढला होता. बँकांचें उत्पन्न १२.७ कोटि रुपयांनीं ( २५.८% ) अधिक झालें, पण खर्चहि १०.० कोटि रुपयांनीं ( २६.१% ) वाढला आणि नफा २.४ कोटि रुपयांनीं सुधारला.

बँकांच्या भारतांतील कचेऱ्यांत १९५७ मध्यें १५५ कचेऱ्यांची भर पडली; १९५६ मध्यें ६५ कचेऱ्यांची वाढ झाली होती. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत बरीच घट होऊनहि ही वाढ घडून आलेली आहे. एकट्या स्टेट बँक ऑफ इंडियानें ८४ नव्या शाखा उघडल्या.

* स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया, १९५७. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें प्रकाशन. किंमत रु. ६.५०.

## टपाल व तार खात्यास ६.३२ कोटि रु. नफा

टपाल व तार खात्यास १९५६-५७ च्या कामकाजांतून ६.३२ कोटि रु. निव्वळ नफा झाल्याचें दिसून येतें. १९५५-५६ व १९५४-५५ चे हेच आंकडे अनुक्रमें ३.४७ व २.६० कोटि रुपये असे होते.

### टपाल व तार कचेऱ्यांत वाढ

देशांतील टपाल कचेऱ्यांची संख्या ३१ मार्च, १९५६ मधील ५५,०४२ वरून ३१ मार्च, १९५७ रोजीं ५८,८७१ वर गेली. त्याचप्रमाणें टेलिफोन एक्सचेंजिसची व तार कचेऱ्यांची संख्याहि अनुक्रमें ५८३० वरून ६२०२ व ९८९३ वरून १०,०५२ वर गेली आहे.

### वाहतुकींत वाढ

पुनर्विलोकनाच्या या वर्षांत टपालानें वस्तू वाहून नेण्याचें प्रमाण ८.८ टक्क्यांनीं वाढलें. १९५५-५६ मध्यें २९९७ दशलक्ष वस्तूंची टपालानें वाहतूक झाली होती. हा आंकडा १९५६-५७ मध्यें ३२६२ दशलक्ष वस्तूंवर गेला. त्याचप्रमाणें सरकारी तारा धरून तारांची संख्याहि ३३.५ दशलक्षांवरच्च ३४.५ दशलक्षांवर गेली, तर या खात्याचे सर्व्हिस कॉल्स् वगळतां प्रत्यक्ष करण्यांत आलेल्या देशाबाहेरील ट्रंक कॉल्सची संख्या १८.६ दशलक्षांवरून २०.८ दशलक्षांवर म्हणजे ११.८ टक्क्यांनीं वाढली.

### उत्पन्न-खर्च

या खात्याचें उत्पन्न सदर वर्षांत १२.३ टक्क्यांनीं वाढलें. १९५५-५६ चें उत्पन्न ५०.६ कोटि रु. होतें तें या वर्षांत ५६.८ कोटि रु. वर गेलें. या खात्याचा महसुली खर्चहि मागील वर्षांतील ४७.२० कोटी रु. वरून या वर्षांत ५०.५१ कोटि रु. वर गेला.

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## भारतांत परकीय भांडवलास उत्तेजन

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, पहिल्या पंचवार्षिक योजनेपेक्षा औद्योगीकरणाच्या कार्यक्रमावर अधिक भर देण्यांत आला आहे. या कार्यक्रमाचें यशापयश उपलब्ध होणारी देशी तसेंच परदेशी साधनसामुग्री मिळण्यावर अवलंबून आहे आणि म्हणूनच या बाबतींत परकीय भांडवलास महत्त्वपूर्ण कामगिरी करतां येईल ही गोष्ट मान्य करण्यांत आली आहे.

या देशाच्या प्रगतीसाठी परकीय भांडवलास किती हातभार लावतां येईल याची भारत सरकारला संपूर्ण जाणीव असल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची साधनें जमवितांना या काळांत १०० कोटि रु. चें नवें परदेशी भांडवल गुंतविलें जाईल ही गोष्ट गृहीत धरली आहे. १९५६ च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावानुसार, सरकारनें विशेषतः परदेशांतील खाजगी भांडवल गुंतविणारांस त्यासाठी उपलब्ध असलेल्या क्षेत्राची खात्री दिली आहे. तदनुसार सर्वसाधारण धोरणाच्या कक्षेत प्रत्येक प्रकरणाचा उपयुक्ततेनुसार विचार करण्यांत येऊन अवश्य तो फेरबदल करण्यांत येतो.

मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यानें मान्य केलेल्या देशाच्या औद्योगिक विकास योजनांशीं सुसंगत व दुसऱ्या योजनेच्या आराखड्यांत येतील अशा औद्योगिक कार्यक्रमांत भारतीय भांडवलदारांबरोबर परकीय कंपन्यांनाहि त्यांत सहभागी होण्यास उत्तेजन देण्याचें भारत सरकारनें धोरण आंखलें आहे. परदेशी भांडवलदारांस समान प्रमाणांत या बाबतींत सहभागी करून घेण्याचे दृष्टीनें भांडवली सामुग्रीवर होणाऱ्या खर्चाइतकी किमान भांडवल-गुंतवणूक परदेशी भांडवलदारांनीं केली पाहिजे, हें सरकारचें तत्त्व आहे. हें समप्रमाण या भांडवलदारांस तितकेंच भांडवल गुंतवून अथवा कांहीं भाग भांडवल व उरलेला भाग कर्ज म्हणून देऊन मिळवितां येईल. तसेंच ही गोष्ट करतांना त्यावर बहुतांशीं नियंत्रण भारतीयांचेंच राहावें,असेंहि सरकारचें मत आहे.

परदेशांतील भांडवलदारांनीं गुंतविलेलें भांडवल परत करण्याचे बाबतींत अथवा अशा भांडवलावर झालेला फायदा कर देऊन परदेशांत पाठविण्यावर कसलेहि निर्बंध नसल्याची हमी सरकारनें दिली आहे. विशिष्ट उद्योगधंद्यांचे बाबतींत परकीय भांडवल तितक्याच प्रमाणांत न घेतां कर्जरूपानें घ्यावें असें भारतीय व परकीय भांडवलदारांस वाटल्यास अशा भांडवल-गुंतवणीवर योग्य दरानें व्याजहि देण्यांत येतें. प्राप्तिकर कायद्यांत नुकत्याच केलेल्या दुरुस्त्यांनुसार अशा कर्जावर, अर्ज केल्यानंतर, प्राप्तिकर आकारण्यांत येत नाहीं.

भारत सरकारनें अमेरिकन सरकारशीं नुकताच एक विनिमय साध्यता करार केल्याचें येथें नमूद करावेंसें वाटतें. या करारानुसार अमेरिकेचें सरकार अमेरिकन भांडवलदारांस, भारत सरकारनें मान्य केलेल्या योजनांत त्यानें गुंतविलेल्या भांडवलाच्या विनिमयसाध्यतेची व त्यापासून त्यास होणाऱ्या उत्पन्नाची हमी देते.

### तांत्रिक सहकार्य

भारतीय कंपन्यांस, आवश्यक अशा परकीय तज्ज्ञांचें वा सल्लागारांचें साह्य घेतां येतें. कोलंबो योजनेनुसार सरकारी पातळीवर अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

### रॉयल्टी

रॉयल्टीचा विचार करतां, रॉयल्टी व परकीय भांडवलदारांनीं परदेशांत दिलेलें साह्य यांत फरक करण्यांत येतो. परकीय साह्यावर प्राप्तिकर नाहीं. रॉयल्टीचे बाबतींत सरकारनें निश्चित दर ठरविलेला नसला तरी तो जास्तींत जास्त ५ टक्के इतका आहे. तथापि कांहीं योग्य प्रकरणीं सरकारनें याहीपेक्षा जास्त टक्के रॉयल्टी मान्य केली आहे.

### कर-आकारणी

देशाच्या औद्योगिक विकासास प्रोत्साहन देण्याकरतां भारत सरकारनें यापूर्वीच करांच्या बाबतींत बऱ्याच सवलती दिलेल्या आहेत. त्यांपैकी कांहीं महत्त्वाच्या सवलती पुढीलप्रमाणें आहेत.

(अ) नव्या औद्योगिक कारखान्यांना, उत्पादनास प्रारंभ केल्यानंतरच्या पहिल्या पांच वर्षांत मिळविलेल्या नफ्यावरील प्राप्तीकरांत सूट.

(आ) ३१ मार्च १९५२ नंतर स्थापन झालेल्या आणि महत्त्वाच्या कांहीं विशिष्ट धंद्यांत संपूर्णतया अथवा प्रामुख्यानें व्यवहार करीत असलेल्या भारतीय कंपनीकडून मिळणाऱ्या लाभांशावरील सुपर टॅक्सबाबत कंपनीस अनिश्चित काळापर्यंत सूट.

(इ) सर्व उद्योगांत, यंत्रसामुग्री बसविल्याच्या पहिल्या वर्षांत नवा कारखाना व नवी यंत्रसामुग्री यांच्या किंमतीच्या २५ टक्के (जहाजांच्या बाबतींत ४० टक्के) विकाससूट दिली जाते त्यामुळें त्यांना घसारानिधीच्या स्वरूपांत कांहीं वर्षांत संपूर्ण किंमत काढून घेतां येईल; इतकेंच नव्हे तर किंमतीच्या २५ टक्क्यांवर कराबाबत आणखी सवलत मिळूं शकेल.

या करविषयक सवलतीमुळें भारतीय उद्योगधंद्यांवर पडणारा कराचा बोजा पुष्कळशा प्रमाणांत कमी होतो. भारतीय नागरिकांना आणि कारखानदारांप्रमाणेंच परदेशीयांना आणि परदेशीय कारखानदारांना करविषयक सवलती मिळतात ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्याजोगी आहे.

त्याखेरीज विशेषतः परदेशीयांना पुढीलप्रमाणें इतर आणखी कांहीं सवलती मिळतात :—

(१) (अ) भारत सरकारनें मान्यता दिलेल्या परदेशांतील एकाद्या आर्थिक संस्थेशीं कर्जविषयक करार करून भारतांतील एकाद्या कारखान्यानें घेतलेल्या कर्जावरील द्यावयाच्या व्याजाच्या रकमेवर प्राप्तीकर आकारला जात नाहीं.

(ब) परदेशांतून यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी भारतांतील एकाद्या औद्योगिक कारखान्यानें परदेशांतून उसने घेतलेल्या पैशावरील किंवा कर्जावरील द्यावयाच्या व्याजाच्या रकमेवर प्राप्तिकर आकारण्यांत येत नाहीं. मात्र या व्यवहारास भारत सरकारची मान्यता मिळालेली असली पाहिजे.

(२) भारतांतील कारखान्यांत नोकरीस असलेल्या परकीय तंत्रज्ञांस तो भारतांत आल्यापासून ३६५ दिवसांच्या मुदतींत त्याला मिळालेल्या पगाराच्या रकमेवर प्राप्तिकर आकारण्यांत येत नाहीं.

### दुहेरी कर-आकारणी

दुहेरी कर-आकारणी टाळण्यासाठी भारत आणि परदेश यांमध्यें कोणत्याहि स्वरूपाचे करार झालेले नसल्यानें व स्वतःच्याच देशांत आपणांला पुरेशा सवलती मिळण्याबाबत वाटणारी अनिश्चितता यामुळें भारतांत भांडवल गुंतविण्यास परकीय भांडवलदार साशंक असतात. परंतु अलीकडेच भारत सरकारचे वरिष्ठ अधिकारी असलेल्या शिष्टमंडळानें कित्येक युरोपियन देशांना भेटी दिल्या. त्यांनीं केलेल्या प्रयत्नांमुळें भारताच्या दृष्टिकोनाची परदेशांत जाणीव झाली. प. जर्मनी आणि स्वीडन यांच्याशीं सरकारी पातळीवरून अलीकडेच करार करण्यांत आले असून आतां त्यांना उभय सरकारांची फक्त मान्यताच मिळावयाची बाकी आहे. युरोपमधील कांहीं इतर देशांबरोबरील करार त्यांच्या अंतिम स्वरूपाच्या विविध अवस्थांत आहेत.

### प्रगतीसाठी रस्त्यांची आवश्यकता

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रेल्वे–वहातुकीला बरेंच प्राधान्य देण्यांत आलें असून रेल्वेमार्गांचा विकास करण्यासाठी मोठी रकम खर्च करण्यांत येणार आहे. रेल्वेची वहातुक महत्त्वाची असली तरी भारतासारख्या अवाढव्य देशांत रस्त्यावरून करण्यांत येणाऱ्या वहातुकीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. मध्यवर्ती सरकारचे वहातूक व दळणवळण मंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं मुंबई येथें बोलतांना, रस्त्यांच्या बांधणीकडे लक्ष वेधलें आहे. श्री. पाटील म्हणाले कीं, सध्यां भारतांत राष्ट्र-विकासाचीं अनेक कामें चालूं आहेत. त्या कामांची पूर्तता होण्यासाठी रस्ते बांधण्याकडे मुद्दाम लक्ष देण्यांत आलें पाहिजे. रेल्वे–वहातुकीच्या साह्यानें जरूर त्या मालाची ने-आण करतां आली, तरीसुद्धां रस्त्यांचे असे स्वयंसिद्ध उपयोग आहेतच. रस्त्यांवरील वहातुकीचें स्वतंत्र असें स्थान मान्य केल्यावर त्यांच्या बांधणीचें महत्त्व सहजच लक्षांत येतें. रेल्वेच्या वहातुकीला पूरक म्हणूनच केवळ रस्ते बांधण्यांत यावेत असें नाहीं. रेल्वेची वहातूक महत्त्वाची असली तरी तिला विशिष्ट अशा कांहीं मर्यादा आहेत. सध्यांच्या वहातुकीच्या प्रश्नांचा विचार करतां रस्त्यांची लांबी एवढाच कांहीं महत्त्वाचा मुद्दा होऊं शकत नाहीं. लांबीबरोबरच त्यांचा टिकाऊपणाहि पाहिला पाहिजे. म्हणून आधुनिक पद्धतीचे रस्ते बांधतांना त्यांच्या आंखणींत अगदीं अद्यावत् तंत्र वापरण्याचें एंजिनिअर्स लोकांनीं ठरविलें पाहिजे. सध्यां आपणांस अनेक बाबतींत परदेशीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो. तसा तो रस्ते बांधण्याच्या कामींहि घ्यावा लागेल. तथापि, हिंदी एंजिनिअर्स नवें तंत्र लवकर आत्मसात् करतील आणि मग त्यांना इतर मागासलेल्या देशांनाहि सल्ला देतां येईल.

---

### पोलिओच्या उच्चाटनाची शक्यता

गेल्या कांहीं वर्षांत पोलिओ ह्या रोगानें जगांतील मोठमोठ्या शहरांत आपलें ठाण मांडलेलें आहे. कॅन्सरवर ज्याप्रमाणें अद्याप कांहीं परिणामकारक औषध सांपडलेलें नाहीं, त्याचप्रमाणें पोलिओवरहि यशस्वी उपाय सापडलेला नाहीं. तथापि, डॉ. अलबर्ट सॅबिन ह्या अमेरिकन डॉक्टरनें शोधून काढलेल्या लसीनें हा रोग बरा होण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. डॉ. सॅबिन ह्यांनीं तयार केलेली लस रशिआंत वापरण्यांत आली असून ती चांगलीच परिणामकारक ठरल्याचें समजतें. लेनिनग्रॅड येथील प्रायोगिक औषधविषयक संस्थेंतील एका प्राध्यापकांनीं ह्या बाबतींत आशादायक मत व्यक्त केलें आहे. ते म्हणतात कीं, डॉ. सॅबिन ह्यांच्या लसीचा उपचार करण्यांत आला तर दोन वर्षांत पोलिओचें उच्चाटन करतां येईल. देवीचा आजार ज्याप्रमाणें आतां नाहींसा झाला आहे, त्याचप्रमाणें पोलिओचाहि होईल. ह्या लसीचा लेनिनग्रॅडमधील १,२०० मुलांवर उपचार करण्यांत आला असतां आश्चर्यजनक यश आलें. ह्यांपैकी कोठलेंहि मूल ३ वर्षांपेक्षा अधिक वयाचें नव्हतें. खुद्द अमेरिकेंत डॉ. सॅबिन ह्यांनीं आपली लस फक्त वयांत आलेल्या लोकांपुरतीच वापरलेली आहे. पण रशिआंतील अनुभवावरून ही लस मुलांच्या पोलिओवर वापरण्यांत मुळींच धोका नाहीं, असें आढळून आलें आहे. डॉ. सॅबिन ह्यांनीं तयार केलेल्या लसीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत आला पाहिजे. अमेरिकेंत सॉक व्हॅक्सिनच्या उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यांत आलेला आहे. माणसाच्या रक्तांतील पोलिओच्या जंतूंचा बंदोबस्त सॉक व्हॅक्सिनमुळें चांगला होतो. पण डॉ. सॅबिन ह्यांच्या लसीनें त्यांचा संपूर्ण नाशच होतो आणि शरिरांत त्याचा कोठेंहि मागमूससुद्धां उरत नाहीं.

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २-८-० |
| चालू डिपॉझिट | ” | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् रु. | ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## बाजारपेठेच्या संशोधनाचें शास्त्र व त्याचा व्यावहारिक उपयोग

हिंदुस्थान लिव्हर लि. चे चेअरमन, मि. एस. एच. टर्नर, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना नेहमीच्या रूढीप्रमाणें मागील वर्षातील कर्तबगारीचें वर्णन केलें नाहीं, किंवा पुढील अडचणींचा पाढा वाचला नाहीं; तक्रारींचीहि उजळणी केली नाहीं. त्याऐवजीं, त्यांनीं कंपनीच्या बाजारपेठेच्या संशोधन-कार्याची माहिती सांगितली. बाजारपेठेची छाननी करून त्यावरून निर्णय घेण्यास मदत करणारें शास्त्र भारतांत अद्याप बाल्या-वस्थेंतच आहे. उद्योगप्रधान, एकसंधी देशांतून अशा शास्त्राची खूपच वाढ झालेली आहे. तथापि, जनतेच्या दैनंदिन गरजा भागविणारे जिन्नस तयार करणाऱ्या कंपनीला आपली बाजारपेठ माहिती असणें आवश्यक आहे; अंधळेपणानें जिन्नस तयार करून स्वतःच्या कल्पनेप्रमाणें त्यांची जाहिरात करणें चुकीचें ठरतें. ग्राहकांना कोणता माल पसंत पडतो, त्यांच्या रहाणीच्या संवयी काय आहेत, त्यांचा दृष्टिकोन कोणता आहे, ह्याचें संशोधन केलें, तर तें मार्गदर्शक ठरतें. मि. टर्नर ह्यांचें भाषण इतर कारखानदारांनाहि मार्गदर्शन ठरणारें आहे.

हिंदुस्थान लिव्हर कंपनीच्या वेगवेगळया जिनसा घेणारे व वापरणारे कोट्यवधि ग्राहक आहेत. ठराविक माल मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून मोठ्या प्रमाणावर विकण्यावर कोणत्याहि कारखान्याचा उत्कर्ष अवलंबून असतो. उत्पादन करावयाचा माल जास्तींत जास्त लोकांच्या पसंतीस उतरला पाहिजे; तरच हें शक्य होणार. गरीब–श्रीमंत, शिक्षित–अशिक्षित, पंजाबी–तामीळ अशा सर्वांनाच माल पसंत पडणें जरूरीचें असतें. ग्राहकांच्या वेगवेगळया तऱ्हांचे वेगवेगळे गट पाडून त्यांच्या आवडी निवडी काढून घेण्यासाठीं त्यांना प्रश्न विचारले जातात. प्रश्न तयार करणें व त्याचें खरें उत्तर मिळविणें. ह्या कौशल्याच्या बाबी आहेत. उत्तर देणार पुष्कळ वेळां प्रश्न विचारणाराला आवडेल असें उत्तर देतो, किंवा स्वतःच्या प्रतिष्ठेला पोषक असें कांहींतरी सांगतो. उदाहरणार्थ, दररोज स्नान करणें इष्ट असा ज्यांचा खरोखरच विश्वास आहे, असे लोक थंडींत वास्तविक आठवड्यांतून तीन–चारदांच स्नान करतात. पाश्चात्य देशांतील एका पाहणींत असें आढळलें, कीं लोक सांगतात तितक्या वेळां त्यांनीं दात स्वच्छ केले, तर टुथपेस्टच्या कारखानदारांना टुथपेस्टचा पुरवठाच करतां येणार नाहीं! केरळमध्यें दररोज दोनदां स्नान करतो म्हणून सांगणारे लोक भेटतात; उलट सौराष्ट्रांत आठवड्यांतून एकदांच स्नान करतो व कपडे धुतो असें सांगणारांना कमीपणा वाटत नाहीं. केरळांत पाणीपुरवठा भरपूर आहे; सौराष्ट्रांत पाण्याचा तुटवडा आहे त्यामुळें दृष्टिकोनांत असा फरक पडतो. उत्तर प्रदेशांतील लोक वनस्पति वापरूनहि, तें कबूल करण्यास तयार होत नाहींत. कारण, तूप खाण्यांतील प्रतिष्ठेला ते बळी पडतात. लोकांना सरळ प्रश्न विचारून खरीं उत्तरें मिळतातच असें नाहीं. म्हणून अप्रत्यक्ष, फसव्या मार्गांनेंहि उत्तरें मिळवावीं लागतात. कांहीं स्त्रियांना चहासाठीं बोलावून, त्यांना मन मोकळें करायला लावणें हा त्यांतला एक मार्ग आहे. त्यामुळें, त्या स्त्रिया मनांतलें सांगून जातात. स्त्रियांच्या मनांतील काढून घेतल्यावर असें आढळून आलें, कीं त्यांचा स्वैंपाकाचा वेळ वाचेल अशा स्वरूपाच्या जाहिराती त्यांना पसंत पडत नाहींत; घरकाम सोपें झालें तर त्यांचें घरांतील महत्त्व कमी होईल असें त्यांना वाटतें! डालडाविरुद्ध तक्रार करण्यांतला खरा हेतु सर्वसाधारण महागाई-विरुद्ध बोलण्याला मिळतें, असा असूं शकतो. गृहिणींना खूप बोलूं दिल्यानें, पुष्कळच वेळां त्यांच्या मनोवृत्तीचा थांग लागतो. त्यांत विवेक असो वा नसो; उदाहरणार्थ, गरीब स्त्री सनलाइट साबण वापरते कारण तो तिला सोईचा वाटतो; श्रीमंत स्त्रीचें धुणें तिचा नोकर धुतो. त्याला कुठलाहि साबण दिला तरी तो नासणारच. मग स्वस्तांत स्वस्त साबण कां न घ्या? असें तिचें म्हणणें असूं शकतें.

बाजारपेठेच्या संशोधनापासून जे निष्कर्ष काढण्यांत येतात, त्यांचा उपयोग कसा केला जातो, ही गोष्ट महत्त्वाची आहे. माल कोण खरेदी करतो? कोणताच माल सर्व ठिकाणीं सारख्या प्रमाणांत खपत नाहीं. उदाहरणार्थ, डालडाचा खप दक्षिण भारतापेक्षां उत्तर भारतांत ज्यास्त आहे. सनलाइट साबण पूर्व भारतांत अधिक खपतो. खप दाखविणाऱ्या नकाशाचा अभ्यास केल्यावर, कमी अधिक खपाची कारणमीमांसा करतां येते. स्थानिक लोकांच्या संवयींचा परिणाम कितपत आणि मालाच्या गुणांचा परिणाम कितपत? डालडाचा खप पंजाबमध्यें व महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर होतो हें खरें आहे, पण तेवढ्यानें केवळ जाहिरातींच्या स्वरूपाची कल्पना येत नाहीं. पंजाबमध्यें खप मोठा असला, तरी अधिक खपाला भरपूर वाव असल्यानें, तेथें जाहिरातींचा उपयोग अधिक होण्याचा संभव. पूर्व भारतांत सर्व प्रकारचे कपडे धुण्यास सनलाइट साबण वापरण्यांत येतो, तर पंजाबांत फक्त चांगले कपडेच सनलाइटसाठीं राखून ठेवले जातात. ह्याचा अर्थ, सनलाइटला पंजाबांत अद्याप भरपूर वाव आहे, असा होतो. कांहीं ठिकाणीं मालाचा खप वाढण्यास फारच थोडा वाव असतो; अशा ठिकाणीं जाहिरात व मालाचें वितरण ह्यावर आणखी खर्च करणें नुकसानकारकच ठरावयाचें, उलट चालू खर्च कमी करणेंच हितावह व्हावयाचें. व्यावसायिक वर्गच एकादा माल वापरीत असेल, तर त्याची जाहिरात जीं वृत्तपत्रें फक्त शेतकरी किंवा कामकरीच वाचतात, त्यांत देण्यांत अर्थ नाहीं.

कारखानदाराला त्याच्या स्वतःच्या मालाचे गुणदोष पूर्णपणें माहीत असतात; कारण त्यास शास्त्रीय आधार असतो. गिऱ्हाइकाचें मत वेगळें असूं शकतें. गिऱ्हाइकाचें मत चुकीचें आहे. आपलेंच बरोबर आहे, असा हट्ट धरून उपयोग होत नाहीं, अर्थात, कारखानदार आपलें म्हणणें पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो.

मालाच्या खपाचे आंकडे बाजारपेठेच्या पहाणीपेक्षा वेगळे कांहीं सांगत असतात, असें नाहीं. परंतु, पहाणीमुळें खप कमी ज्यास्त होण्याचीं कारणें कळूं शकतात. दुकानदार, विक्रेते, ह्यांचे अनुभवहि उपयुक्त ठरतात. बाजारपेठेच्या संशोधनानेंहि कित्येक प्रश्नांचीं उत्तरें मिळूं शकत नाहींत; अशा वेळीं कारखान-दाराला स्वतःच्या अंदाजांवरच विसंबावें लागतें! सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरांचा लोकांच्या मागणीवर खूपच परिणाम होत असतो. चित्तरंजन आणि सिंद्री अशा सारख्या नव्या औद्योगिक शहरांतून कामगारांना बक्कळ वेतन मिळूं लागतें व त्यांचें रहाणीचें मान वाढतें; पूर्वी जो माल ते घेऊं शकत नव्हते, तो ते आतां घेऊं लागतात हीं नवीं वाढतीं औद्योगिक शहरें म्हणजे नव्या, किफायतशीर, वाढत्या बाजारपेठा होत. चालू मालांत कोणत्या प्रकारचा बदल करावयला हवा, हेंहि संशोधनापासून कळूं शकतें.

भुइमुगाच्या पिकाचा सहकारी अधिकृत अंदाज फेब्रुवारीअखेर हातीं येतो; पण भुइमुगाची मोठी खरेदी मात्र डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी ह्या महिन्यांत केली जाते. खरेदीचें धोरण आखण्यासाठी, अपेक्षित उत्पादनाची कल्पना आगाऊ आली तर ती मार्गदर्शक होते. साध्या शेतकऱ्यांपैकी कांहींना सोपे प्रश्न विचारून त्या-वरून पिकाचा अंदाज केला, तर त्यावरून पिकाची परिस्थिति कळून येते आणि उत्पादनाची कल्पना येऊन कारखान्यांना किंमतींचाहि आगाऊ विचार करून ठेवतां येतो.

गिऱ्हाइकांना पसंत पडेल असा माल बनवून केवळ भागत नाहीं. तो त्यांना विकत घ्यायला लावावा लागतो. त्यासाठी जाहिरातींची योजना करणें जरूर असतें. जाहिरातींवरील खर्च अधिकांत अधिक फलदायी कसा होईल, हें पहावें लागतें. दुकानांतील रंगीबेरंगी पाट्या, सिनेमा, वृत्तपत्रांतील जाहिराती, भिंतीवरील जाहिराती, इत्यादि मार्गांनीं लोकांच्यापुढें मालाचें नांव ठेवलें जातें; त्यांपैकी कशाचा, कुणावर व किती परिणाम होतो, हें गिऱ्हाइकांनाहि सांगतां येणार नाहीं; कारखानदारालाहि तें नीटपणें समजूं शकत नाहीं. म्हणून, एकसारखी चाचणी चालू ठेवावी लागते. लोक खरेदी कां करतात, कशाचा त्यांचेवर परिणाम होतो हें कळलें म्हणजे प्रचाराला मदत होते; खपाला चालना मिळते. ह्यासाठी बाजारपेठेच्या संशोधनास अतिशय महत्त्व आहे.

---

### रशिआशीं व पूर्व युरोपीय देशांशीं होणारा व्यापार

मध्यवर्ती सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याचे उपमंत्री श्री. सतीशचंद्र ह्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय प्रतिनिधींचें एक मंडळ रशिया व पूर्व युरोपांतील देशांच्या दौऱ्यावर गेलें होतें. रशियाचा राष्ट्रगट आणि भारत ह्यांच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापाराची वृद्धि करणें कितपत शक्य आहे, ह्यासंबंधीं निरीक्षण करून मंडळ आतां परतलें आहे. श्री. सतीशचंद्र आपल्या दौऱ्याविषयीं बोलतांना म्हणाले कीं, भारत व रशिआंकित राष्ट्रगट ह्यांच्या एकूण व्यापाराच्या मानानें उभयतांमधील व्यापार अल्पच आहे. त्यांतहि ह्या व्यापारांत भारताला प्रतिकूल तफावत सोसावी लागत आहे. १९५७ सालीं भारतानें ह्या राष्ट्रगटाला २७ कोटि रुपये किंमतीचा माल निर्यात केला व उलटपक्षीं ३५ कोटि रुपये किंमतीचा माल आयात केला. ह्या व्यापारांत समतोलपणा आणून त्याची वृद्धि करण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत.

भारताला रशियन राष्ट्रगटाकडून औद्योगिक कच्चा माल, रसायनें, यांत्रिक हत्यारें, खतें, विजेचीं उपकरणें, वृत्तपत्राचा कागद, इत्यादि माल पाहिजे आहे. भारताकडून ह्या देशांना चहा, तागाच्या वस्तु, तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, सुती कापड, लाख, अभ्रक, इत्यादि माल मिळूं शकेल. सध्यां परदेशीय चलनाच्या अडचणी आहेत, त्या कमी करण्यांत आल्या आणि आयात केलेल्या मालाची किंमत रुपयांत स्वीकारण्यांत आली तर उभयतांमधील व्यापार आणखी वाढण्याची शक्यता आहे. पण भारत निर्यात करीत असलेल्या नेहमींच्या मालाला वरील देशांत फारशी मागणी नाहीं. छोट्या विजेच्या मोटारी, शिवण्याची यंत्रें, सायकली, इत्यादि वस्तूंना मात्र चांगली मागणी आहे. युगोस्लाव्हिआ ३०,००० टन साखर भारताकडून घेण्यास तयार आहे.

**डॉ. सी. व्हीं. रमण परतले**—सुप्रसिद्ध हिंदी शास्त्रज्ञ व संशोधक डॉ. सी. व्हीं. रमण रशिआ व पूर्व युरोपांतील शास्त्रीय संशोधन संस्थांचें निरीक्षण करण्यासाठी तिकडे गेले होते. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत अनेक ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. त्यांचा दौरा समाधानकारक झाला. आपल्या निरीक्षणावर आधारलेला अहवाल ते भारत सरकारला सादर करणार आहेत.

**तेलवाहू बोटीची मागणी**—सरकारी मालकीच्या वेस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशननें जपानमधील एका कारखान्याकडे एका तेलवाहू बोटीची मागणी नोंदविली आहे. बोटीचें वजन १०,००० टन असेल आणि तीसाठी १ कोटि रुपये द्यावे लागतील. कोबे ह्या जपानमधील शहराजवळील गोदींत ती बांधण्यांत येणार आहे.

**वैमानिक वहातुकीची सुरक्षितता**—ऑस्ट्रेलिआंतील विमानवहातूक सर्वांत अधिक सुरक्षित आहे अशी तिची प्रसिद्धि आहे. ह्या सुरक्षिततेचें रहस्य समजावून घेण्यासाठी भारत सरकारच्या मुलकी हवाई खात्याचे दोन अधिकारी शिक्षण घेणार आहेत. कोलंबो मदत योजनेप्रमाणें त्यांना सहा महिने ऑस्ट्रेलिआंत जाऊन अभ्यास करावा लागेल.

**म्हैसूर राज्यांतील प्रेक्षणीय स्थळें**—म्हैसूर राज्यांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयास येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीवर १९५८-५९ सालीं १४ लाख रुपये खर्च करण्याचें राज्यसरकारनें ठरविलें आहे. म्हैसूर राज्यांत विजापूर, हंपी, बदामी, जोग धबधबा इत्यादि ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. हंपी येथें विजयनगराचे प्राचीन अवशेष आहेत.

**गाळ उपसण्याचें प्रचंड यंत्र**—खाड्या, नद्या अगर बंदरें गाळ साचून धोक्याचीं होतात. त्यामधील गाळ मधून मधून काढावा लागतो. अशा प्रकारचें एक प्रचंड यंत्र जर्मनींत बन-विण्यांत आलें आहे. त्याची लांबी ५९० फूट असून उंची २३० फूट आहे.

**आगीमुळें झालेलें नुकसान**—मुंबई येथील शिवडी भागांत असलेल्या ज्युबिली मिलला नुकतीच फार मोठी आग लागली होती. ह्या आगीमुळें गिरणीचें ४२ लाख रुपयांचें नुकसान झालें असा अंदाज करण्यांत आला आहे. आग प्रथम सूतखात्यांत लागली. आगीच्या बंबांनीं खूप प्रयत्न केल्यामुळें विणकामाचें खातें आगीपासून बचावलें.

**अणुशास्त्रज्ञाचें निधन**—सुप्रसिद्ध फ्रेंच अणुशास्त्रज्ञ जॉलिओ क्यूरी आपल्या वयाच्या ५८ व्या वर्षीं पॅरिस येथील एका इस्पितळांत निधन पावले. गेलीं तीन वर्षें ते आजारी होते. १९३५ सालीं त्यांना व त्यांची पत्नी ह्यांना पदार्थविज्ञानशास्त्राचें नोबेल पारितोषिक मिळालें होतें. १९५१ सालीं त्यांना रशिआनें शांतता पारितोषिकहि दिलें होतें.

**शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांची वूज**—परदेशांतून शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण घेऊन येणाऱ्या लोकांची एक यादी तयार करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या लोकांना त्यांच्या-जोगतें काम मिळेपर्यंत दरमहा ३०० ते ६०० रुपयांपर्यंत तनखा देण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे. परदेशीं शिकून आलेल्या तज्ज्ञांनाहि नोकऱ्या मिळत नाहींत अशी तक्रार आहे.

**बंगलोर शहराला दुधाचा पुरवठा**—बंगलोर शहरांतील लोकांना निर्जंतुक दुधाचा पुरवठा करण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. दूध शुद्ध करण्यासाठी बसविण्यांत यावयाच्या यंत्रसामुग्रीचा पायाभरणी समारंभ ता. २३ ऑगस्ट रोजीं अन्न व शेतकीमंत्री श्री. जैन ह्यांच्या हस्तें होणार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.